● रविवार, दि. १२ जानेवारी २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १६५ वा ● किमंत २ रु. ● पाने ४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ MAHMAR/2013/50827

## बजरंग दलच्या कार्यकर्त्यांनी गाय कोंडून भरलेला ट्रक पकडून दिला पोलिसांच्या ताब्यात

### तील लाखांच्या जनावरांसह सहा लाखांचा मुद्देमाल पोलीसांनी केला जप्त



जालना । प्रतिनिधी - होत असलेला आयशर अवैधरित्या गोवंशाची वाहतूक चंदनझीरा पोलीसांनी ताब्यात घेतला असून या वाहनामध्ये तब्बल १६ गायींची वाहतूक होत असल्याचे आढळून आले.

याविषयी दि.११ शनिवार रोजी सकाळी दहा वा. च्या सुमारास मिळालेल्या माहिती नुसार जालना येथील गौरक्षक आणि बजरंग दलाचे कार्यकर्ते यांना पांढऱ्या रंगाच्या आयशर मध्ये गोवंशाची वाहतूक होत असल्याची गुप्त माहीती मिळाली होती. त्यावरून बजरंग दालाच्या कार्यकर्त्यांनी नागेवाडी समोरील काकडे पेट्रोल पंप झिरो पाईट जवळ दबा धरून बसले असता काल शुक्रवार रोजी रात्री पावणे अकराच्या सुमारास पांढऱ्या रंगाचा आयशर समृध्दी महामार्गावर जाण्यासाठी वळाला आसता बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी त्यास अडवण्याचा प्रयात्न केला परंतू आयशर चालकाने गाडी न थांबवता समृध्दी महामार्गाकडे पळवली. बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी आयशरचा पिच्छा करून समृध्दी वरील टोलनाक्यावर त्यास पकडून वाहनात पान २ वर

## भाजपाच्या प्रदेश कार्यकारी अध्यक्षपदी रवींद्र चव्हाण

**मुंबई -** भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा यांनी आमदार रवींद्र चव्हाण यांची भाजपच्या महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. भाजपचे राष्ट्रीय महासचिव अरुण सिंह यांनी याबाबतचे पत्रक काढले आहे. त्यांच्या नावाची प्रदेशाध्यक्षपदासाठीची चर्चा होती. मात्र त्यांच्यावर कार्यकारी प्रदेश अध्यक्षपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रदेशाध्यक्षपद अद्याप सोडलेले नाही.

**जालना शहरातील दानकुंवर विद्यालय परिसरात पदारो मारो देश या कार्यकमात शहरातील कालिका स्टीलचे मुख्य संचालक उदयोजक घनश्याम सेठ गोयल याचा सत्कार करतांना राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडी सोबत डॉ. भागवत कराड दिसत आहे.**



## सुरक्षित प्रवासासाठी नागरिकांनी एस.टी.ला प्राधान्य द्यावे - चौरे



**परतूर । प्रतिनिधी -** परतूर आगारात राष्ट्रीय रस्ता सुरक्षा महिना अभियानाचा शुभारंभ दि. ११ जानेवारी रोजी एस. टी. बसने केलेला प्रवास हा सुरक्षित प्रवास असतो म्हणून प्रवाशांनी राज्य परिवहन महामंडळाच्या बसने प्रवास करण्यास प्राधान्य द्यावे असे प्रतिपादन उपविभागीय पोलीस अधिकारी दादाहरी चौरे यांनी केले.

येथील बस आगारात राष्ट्रीय रस्ता सुरक्षा महिना अभियानाचे उदघाट्न चौरे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी आयोजित कार्यक्रमात उदघाटक म्हणून ते बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आगारप्रमुख माधुरी देशमुख या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून निवृत्त प्राचार्य डॉ. भगवान दिरंगे, बाबासाहेब माकोडे, पालक अधिकारी वंदना पोंगुळ, वाहतूक निरीक्षक सुरेखा साळवे, जगदीश बरसाले, लेखकार कुलकर्णी, बालाजी ढोबळे यांची उपस्थिती होती.

चौरे पुढे म्हणाले की, आजकाल अपघाताचे प्रमाण वाढले आहे. कुणाच्या तरी चुकीमुळे अपघात होतात. परंतु त्यामुळे अनेकांना नाहक जीवाला मुकावे लागते किंवा जखमी व्हावे लागते. वाहन चालवत असताना चालकांनी विशेष काळजी घेणे गरजेचे असते.राज्य परिवहन महामंडळाचे चालक हे गाडी चालवत असताना विशेष काळजी घेऊन जबाबदारीचे पालन करतात. म्हणूनच पूर्वीपासून सुरक्षित प्रवासासाठी नागरिक एस. टी. बसला प्राधान्य देतात. यापुढेही प्रवास पान २ वर

### राज्यस्तरीय आदर्श शिक्षक सेवा गौरव पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात

## सहा शाळांना आदर्श पुरस्कार; २८ शिक्षकांचा सन्मान

**जालना । प्रतिनिधी -** येथील १०० शिक्षक क्लब तर्फे म हात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त देणाऱ्या राज्यस्तरीय आदर्श शिक्षक सेवा गौरव व आदर्श शाळा पुरस्कार वितरण सोहळा बुधवार दि. ८ जानेवारी रोजी जालना शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात पार पडला. पुरस्कारार्थी शिक्षकांचा व शाळांचा सन्मान करण्यासाठी जालना शहर मनपा आयुक्त संतोष खांडेकर,शिक्षणाधिकारी मंगलताई धुपे, बालसाहित्यिक विशाल तायडे,उपशिक्षणाधिकारी श्याम देशमुख, गटशिक्षणाधिकारी रवी जोशी, विस्तार अधिकारी सुभाष भालेराव, एमजी जोशी, एस एन कुलकर्णी, प्रा.ज्योती धर्माधिकारी,डॉ. पद्माकर सबनीस, डॉ. प्रदीप हुशे, उदय शिंदे व आर आर जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती. पुरस्कारार्थी शिक्षकांचा मानाचा फेटा, आकर्षक सन्मानचिन्ह व फ्रेम केलेले प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. देखण्या व लक्षवेधक पुरस्कार वितरण सोहळ्याचे नियोजन बघून राज्यातून आलेले शिक्षक भारावून गेले होते. आकर्षक रांगोळी सर्वांचे लक्ष वेधून घेत होती तर आलेल्या पुरस्कारार्थी शिक्षकांना सन्मानाने गुलाब पुष्प देऊन स्वागत करून सन्मानाने फेटे बांधले गेले व भारतीय संस्कृतीच्या अतिथी देवोभव उक्तीप्रमाणे औक्षण करून सभागृहात नेमून दिलेल्या जागेवर आदराने बसविण्यात आले.

यावेळी शिक्षणाधिकारी धुपे, बालसाहित्यिक तायडे व प्रा. जोशी यांनी उपस्थित शिक्षकांना मार्गदर्शन करतांना सांगितले की, पुरस्कार बळ व प्रेरणा देण्याचे काम करतात. तेव्हा येणाऱ्या काळातील येणारी नवनवे आव्हाने ओळखून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण देण्यासाठी नवनवे उपक्रम राबवावेत.ज्यामुळे विद्यार्थी आपल्या स्वतः च्या पायावर भक्कमपणे उभा राहिला पाहिजे. तत्पूर्वी १०० शिक्षक क्लबचे अध्यक्ष राजेभाऊ मगर व निवड





समितीचे अध्यक्ष आर आर जोशी यांनी समुहाच्या कार्याची व पुरस्कार निवड प्रक्रियेबद्दल माहिती दिली.

या पुरस्कार वितरण सोहळ्यात राज्यातील २८ शिक्षकांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. यात १४ शिक्षक जिल्हा परिषदेचे व १४ शिक्षक खाजगी संस्थेतून निवडण्यात आले होते. त्याचबरोबर सहा शाळांना आदर्श शाळा पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. तसेच यावर्षीचा महाराष्ट्र शासनाचा क्रांतीज्योती सावित्रीबाई राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल डॉ. शिवनंदा म हेत्रे,जिप प्रशाला मुलांची,जालना व दिपाली सतीश सावंत,जिप प्राथमिक शाळा,शेकापूर (बाई) जि. वर्धा यांचा आणि डॉ. प्रदीप हुशे, डॉ. बळीराम बागल, प्रा.श्रीकांत चिंचखेडकर, प्रकाश कुंडलकर, भिमाशंकर आप्पा दारूवाले व कैलास आप्पा गबाळे यांचाही आरोग्य,शैक्षणिक सामाजिक कार्यातील योगदानासाठी विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आप्पासाहेब मुळे यांनी तर आभार प्रदर्शन साजिद खान पठाण यांनी केले.

कार्यक्रमाच्या आयोजनासाठी संदीप इंगोले, विष्णू बिरादार, दिपक चाटे, दत्तात्रय राऊतवाड,जगन वाघमोडे, विजय निकाळजे, साजिद खान पठाण, अशोक माधवले,विलास जमधडे, माया कवानकर, मनिषा पाटील,कविता दाभाडे, शुभांगी लामधडे, सविता तायडे, प्रभा जाधव यांनी परिश्रम घेतले तर नियोजनाची जबाबदारी जमीर शेख, पीजी बोराडे, पान २ वर

युवा आदर्श

### युवा पिढी ...

सन्मानाची नोंद ही
युवकांचा देशभारत
पासष्ट टक्के तरुण
आशादायी ही मुरत
वर्ग हा उच्चशिक्षीत
अनेक कला अवगत
सुकाणू त्यांच्याहाती
करायला हवे स्वागत
पुढे यायचे तरूणांनी
जेष्ठ राहतात सांगत
स्वताचं बसे पाटावर
बसता जेवाया पंगत
उक्ती आणि कृती ती
दोन्ही अगदी विसंगत
म्हातारे लागे पळाया
युवक राहतात रांगत
वृध्दांनी बाजू सरावे
का बसायचे अडवत
युवकांचा देश बोलत
नगारे राहता बडवत
नशेची दुकाने उघडी
पिढीचालली वाहवत
विरूद्ध दिशेने प्रवास
अधोगती ना पाहवत
सोशल मिडिया जाळे
गर्तेत जातातअडकत
गुन्हे उगाचं नावावरी
दंगली जाता भडकत
तरूणाईला हक्क द्या
नकोयं भिकेची दावत
आशिर्वाद रे वरिष्ठांचा
मनोमन ज्योती तेवत

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## धाकलगांव जिल्हा परिषदेच्या शाळेवर सीसीटीव्ही वॉच...



**अंबड । प्रतिनिधी -** खासगी शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे ही काही नवीन बाब नाही, परंतु जिल्हा परिषदेच्या धाकलगांव येथील शाळेतील मैदानावरील हालचाली टिपण्यासाठी आता सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. कॅमेऱ्यांचे कंट्रोल मुख्याध्यापकांच्या दालनात आहे. तेथे बसुन हे माहिती झाल्यामुळे विद्यार्थ्यांना शिस्त लागली आहे. तसेच परिसरात सुरक्षितता, स्वच्छता आणि शांततेसाठीही कॅमेरे उपयोगी ठरताहेत. एकुण आठ कॅमेरे बसविण्यात आले शाळेचे प्रवेशद्वार, प्रसाधनगृहाबाहेर, शाळेच्या खोल्यांबाहेरील मोकळी जागा आदी ठिकाणी या कॅमेऱ्यांची नजर असणार आहे. खासगी शाळेलाही लाजवतील अशा अनेक सुविधा या शाळेत आहेत. संगणक लॅब, सोलार इन्व्हर्टर आता त्यात क्लोज सर्किट टेलिव्हिजन कॅमेऱ्यांची भर पडली आहे.

आमची शाळा शिस्तप्रिय आहे; पण कधी- कधी विद्यार्थी दंगामस्ती करतात आणि सुट्टी असल्यावर शाळेच्या परिसरातील सुरक्षितताही महत्त्वाची आहे. कॅमेऱ्यामुळे बसल्या ठिकाणाहून संपूर्ण परिसरावर लक्ष ठेवण्यासाठी मदत होते अशी प्रतिक्रिया शाळेच्या मुख्याध्यापिका कुमार कसाब यांनी दिली.



# संपादकीय पान

## आजची युवा पिढी व सद्यस्थिती

जगातील सर्वात तरुण जन देश जर कोणता असेल तर तो आपला भारत देश आहे. आज आपल्या देशाची लोकसंख्या १४४ कोटी इतकी आहे. आपल्या देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी ६० टक्के लोकसंख्या ही १८ ते ४० या वयोगटातील आहे. या तरुणांमध्ये खूप ऊर्जा आहे. देशाचे भविष्य याच तरुणांवर अवलंबून आहे. याच तरुणांच्या जोरावर आपण महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहोत. माजी राष्ट्रपती ए पी जे अब्दुल कलाम यांचा तर तरुणांवर खूप विश्वास होता. तरुणच आपल्या देशाचे भाग्यविधाते आहेत असे ते म्हणत. या तरुणांकडे असलेल्या ऊर्जेचा उपयोग देशकार्यासाठी करुन घ्यावा असे त्यांचे मत होते. पण आज तरुणांसमोर अनेक आव्हाने आहेत. सर्वात मोठे आव्हान आहे ते बेरोजगारीचे. आजचे तरुण उच्चविद्याविभूषित आहेत. हुशार आहेत. ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, कला, क्रीडा, साहित्य अशा सर्वच क्षेत्रात आजचे तरुण अग्रेसर आहेत. देशासाठी काहीतरी करुन दाखवण्याची जिद्द त्यांच्याकडे आहे. शिक्षण आणि काम करण्याची उर्मी असूनही त्यांच्या हाताला रोजगार नाही. पदव्यांचे भेंडोळे घेऊन तरुण जागोजागी फिरत आहेत मात्र त्यांना नोकरी मिळत नाही. सरकारी नोकर भरती बंद आहे. खाजगी क्षेत्रात नोकरी मिळत नाही. ज्यांना आहे त्यांना नोकरी टिकवणे मुश्किल झाले आहे. स्वतःचा व्यवसाय, उद्योग करायचा म्हटले तर भांडवल नाही. शेतीही बेभरवशाची झाली आहे त्यामुळे आजचे तरुण हताश झाले आहेत. या हताश तरुणांना धीर देऊन त्यांना रोजगार देण्याऐवजी राजकीय नेते त्यांना पकोडे विका असे म्हणून त्यांच्या जखमेवर मीठ चोळत आहेत. रोजगार नसल्याने तरुणांमध्ये प्रचंड निराशा पसरली आहे. नैराश्यातून काही तरुणांनी आत्महत्येचा मार्ग स्वीकारला आहे तर काही तरुण व्यसनांच्या आहारी गेले आहेत. हे पाहून मन खिन्न होते. रोजगार मिळत नसल्याने तरुणांच्या मनात व्यवस्थेविरुद्ध सुप्त असंतोष आहे. या असंतोषाचा भडका होण्याआधीच सरकारने तरुणांना रोजगार मिळवून देण्यासाठी ठोस धोरण आखावे. जर या तरुणांच्या मनातील असंतोषाचा भडका झाला तर भल्याभल्यांना पळता भुई थोडी होईल. सध्याच्या बेरोजगारीचा दर हा मागील ४५ वर्षातील सर्वात जास्त आहे ही बाब आपल्या देशाला भूषणावह नाही. हा दर कमी करण्यासाठी आणि तरुणांना रोजगार मिळवून देण्यासाठी सरकार काही ठोस प्रयत्नही करताना दिसत नाही. या तरुणाईचा वापर केवळ मते मिळवण्यासाठीच केला जात आहे असेच दुर्दैवाने म्हणावे लागेल. तरुणांच्या हाताला काम मिळणे ही काळाची गरज आहे कारण तरुणांच्या हाताला काम मिळाले नाही तर तरुणाई भरकटण्याची शक्यता अधिक आहे. त्यांच्या शिक्षणाचा, त्यांच्यातील ऊर्जेचा समाजाला, देशाला उपयोग होण्याऐवजी ती ऊर्जा वाया जाण्याचीच शक्यता अधिक आहे. जगात सर्वात जास्त तरुण भारतात आहे. जगात चिननंतर सर्वात जास्त लोकसंख्या भारतात आहे. खरंतर याला समस्या न मानता संधी मानली पाहिजे. या संधीचे सोने करुन तरुणांच्या हाताला रोजगार दिल्यास भारत महासत्ता बनेल यात शंका नाही. आपण समोरच्याला समजून न घेता त्याचा दुस्वास कसा करू शकतो? या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचे ते सतत प्रयत्न करीत असतात. त्यांना एक स्थिर व सुरक्षित अर्थव्यवस्था हवी आहे. आपल्या आजूबाजूच्या परिसराबाबत ते तितकेच जागृत असतात.संपत्ती कधीतरी संपून जाईल त्यामुळे तिचा जपून वापर करण्यास ते प्राधान्य देतात. थोडक्यात सांगायचे तर आजचा तरुण जबाबदार आहे. तो आपल्या शिक्षणाकडे गांभीर्याने पाहत आहे. याचवेळी पैशापेक्षा आनंद महत्वाचा असल्यामुळे तो आपल्या आवडीनुसार करियर निवडण्यास प्राधान्य देतोय त्यामुळे आपण जे काही काम करीत आहे त्यासाठी लोकांनी आपल्याकडे मानाने पहावे अशी त्यांची इच्छा आहे. आपल्या देशातील ६९ टक्के तरुणांना ठाम विश्वास आहे की पैसे त्यांच्यासाठी आनंद विकत आणू शकत नाही तर ८० टक्के तरुणांना पैशापेक्षा कला, ७९ टक्के तरुणांना पैशापेक्षा शिक्षण आणि ७६ टक्के तरुणांना पैशापेक्षा यश महत्वाचे वाटते.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# विजय लोखंडे; उत्कृष्ट महानगरपालिका अधिकारी

एखाद्या अधिकाऱ्याने केवळ पाट्या टाकायचे काम न करता मनापासून आपली कर्तव्ये आणि सेवा बजावली तर त्याला मिळणारा आनंद,लोकांच्या मनात त्याच्यासाठी निर्माण होणारी जागा ही खऱ्या लोक सेवकाची गुण वैशिष्ट्ये असतात. असेच एक आदर्श अधिकारी म्हणजे सोलापूर महानगर पालिकेत सध्या विभागीय अधिकारी म्हणून कार्यरत असलेले विजय लोखंडे हे होत. तसे पाहिले तर श्री लोखंडे यांना लोक सेवेचा वारसा घरातूनच मिळाला आहे . त्यांचे वडील कै सूर्यकांत बापूजी लोखंडे हे महाराष्ट्र शासनाच्या महसूल खात्यात होते. पुढे ते तहसीलदार पदापर्यंत पोहोचले आणि त्याच पदावरून निवृत्त झाले. पण त्यांची इतकीच ओळख नव्हती तर ते जातील तिथे, येथील लोकांशी एक रूप होऊन त्यांच्या समस्या आत्मीयतेने सोडविण्यासाठी प्रयत्नशील असत. त्यामुळे जिथे जिथे त्यांनी सेवा बजावली,तिथे तिथे त्यांना लोकांचे अफाट प्रेम मिळाले. त्यांना अन्न धान्य पुरवठा विभाग ,करमणूक विभाग यांची आणि महत्वाचे म्हणजे कुळ कायद्याची उत्तम जाण असल्याने त्यांनी शासनाचा महसूल वाढविण्याचे काम विलक्षण गतीने पूर्ण केले.

वडीलांच्या लोक सेवेचा वारसा आपण चालवायचा याचा निश्चय करून विजय यांनी स्थापत्य अभियांत्रिकी तील पदविका प्राप्त केल्यानंतर स्वतःचा बांधकाम व्यवसाय सुरू करण्याचा किंवा मुंबई/ पुणे किंवा परदेश गाठून तिकडे नोकरी करण्याचा पर्याय न निवडता ते सोलापूर महानगरपालिकेत कनिष्ठ अभियंता पदी रुजू झाले आणि त्यांची महानगर पालिकेतील सेवा सुरू झाली. आपले काम तडफदार, लोकाभिमुख राहून सुरुवात करीत आल्याने श्री विजय लोखंडे हे प्रशासन आणि नागरिक अशा सर्वामध्ये लोकप्रिय रहात आले आहेत. वेळोवेळी पदोन्नती मिळून आता ते विभागीय अधिकारी म्हणून कामकाज करीत आहेत.

विजय लोखंडे यांनी केवळ चाकोरीबद्ध काम न करता नव्या नव्या संकल्पना प्रत्यक्षात साकार करण्यावर सतत भर दिला.यासाठी ते नेहमी वरिष्ठ आणि त्याच बरोबर कनिष्ठ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना विश्वासात घेत आले आहेत. त्यामुळे ते त्यांच्या संकल्पना प्रत्यक्षात यशस्वीपणे अंमलात आणू शकले. विजय लोखंडे यांनी त्यांच्या नेतृत्वाखाली नेत्रदीपक अशी कार्यालय सुधारणा आणि सुशोभीकरण केले.यात अंतर्गत स्वच्छ्ता , त्यासाठी केलेला एस ओ पी , नेटके फर्निचर आणि नेट सारख्या सर्व सोयी प्रत्येकाच्या टेबलपर्यंत पोहचविण्यासाठी अथक परिश्रम याचा समावेश आहे. तसेच मनपात तेच ते, एकाच



प्रकारचे काम करून कंटाळलेल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या मनाची स्वच्छ्ता महत्वाचे आहे,हे ओळखून त्यांच्या मनातील जळमटे काढणे आणि आपण इथे का व कशासाठी काम करतो याची जाणीव निर्माण होऊन ते सेवाभावी वृत्तीने काम करायला लागतील यासाठी सर्वांची मने बदलण्यासाठी ते जाणीवपूर्वक प्रयत्न करीत असतात. आपल्या अधिनस्त असलेल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या मनातील मरगळ दूर करून सगळ्यांनी उत्साहाने कामास लागावे हा दृष्टीकोन समोर ठेवून त्यांनी प्रथम विभागीय कार्यालय चांगले करून घेतले. यासाठी त्यांचे अभियंता कौशल्य त्यांनी पणाला लावले . केवळ कार्यालयीन वेळेतच कार्यालयाचे काम असा संकुचित विचार न करता ते स्वतःचा खासगी वेळ कार्यालयीन वेळेनंतरही कार्यालयासाठी देत असतात. त्यांनी कार्यालयातील तीस पस्तीस वर्षांपूर्वीपासून असलेली घाण काढून कार्यालयाची स्वच्छ्ता करून घेतली. कार्यालय केवळ स्वच्छ, नीट निटके करून न थांबता त्यांनी स्वतः बाजार पेठेत जाऊन ,काही मोठ्या शो रूम हुडकून चांगले साहित्य माफक दरात मिळवून ही कामे स्वस्तात कशी होतील, हे पाहिले.कौतुकाची बाब म्हणजे आर्किटेक्ट होऊन इंटिरियर डेकोरेटर म्हणून पुण्यात स्वतःचा उत्तम व्यवसाय करणाऱ्या त्यांच्या मुलीने, गौरीने वडिलांच्या कार्यालयाचे सुशोभीकरण म्हणजे जणू आपल्या घरचेच कार्य आहे, असे समजून एक पैसाही न घेता,स्वतःच्या कल्पनेतून आराखडा निश्चित करून त्याची स्वतःच्या देखरेखीखाली चांगली अंमलबजावणी केली. त्यामुळे आता या कार्यालयाला उत्कृष्ट असा कॉर्पोरेट लूक मिळाला आहे. तसेच आता प्रत्येक कर्मचाऱ्याच्या डोक्यावर पंखा आहे. प्रत्येकास स्वतंत्र नेट कनेक्शन , चार्जिंग पॉइंट इतक्या बारीक सारीक बाबीत लक्ष देवून वडिलांना कार्यालयाच्या सुशोभीकरतात हातभार लावला.त्यामुळे एका वर्षांपूर्वी जर कुणी या कार्यालयात गेले असतील आणि आता गेले तर कार्यालयाचा झालेला कायापालट पाहून ते चकितच होतात.याचेच फलित म्हणजे अलीकडील काळात महानगर पालिकेने हाती घेतलेल्या विशेष स्वच्छ्ता मोहीम स्पर्धेमध्ये श्री विजय लोखंडे यांच्या विभागीय कार्यालयाने सर्व विभागीय कार्यालयांमध्ये तिसरा क्रमांक पटकावला.याबद्दल महापालिका आयुक्तांच्या हस्ते नुकतेच त्यांना स्मृतिचिन्ह आणि प्रशस्ती पत्र प्रदान करून गौरविण्यात आले.

विशेष म्हणजे श्री लोखंडे यांच्या लोकाभिमुख सेवा बजावण्याच्या उपक्रमात पत्नी सौ राखी हीची देखील मोठी साथ आहे,कामामुळे घरी यायला उशीर झाल्यास,सुट्टी च्या दिवशीही कार्यालयात जावे लागल्यास ती कधीही कुरबुर करीत नाही, उलट माझ्या सर्व उपक्रमास तिचा पाठिंबाच असतो,त्यामुळे काम करायला अधिक हुरूप येतो,असे श्री विजय लोखंडे अभिमानाने सांगतात. विजय लोखंडे यांच्या यशाचे रहस्य म्हणजे ते,केवळ कार्यालयात बसून तथाकथित साहेबकी न करता वेळ प्रसंगी स्वतः रस्त्यावर उतरतात. भर उन्हात ते कनिष्ठ अधिकारी,कर्मचारी यांच्या सोबत मिळून मिसळून काम करतात, हे होय. त्यांच्या कार्य शैलीची काही उदाहरणे द्यावयाची झाल्यास, ती पुढील प्रमाणे देता येतील. विभागीय अधिकारी म्हणून विभागीय कार्यालय क्रं ६ येथे कार्यरत असताना कार्य क्षेत्रातील दाट झोपडपट्टीत राहणाऱ्या नागरिकांसाठी नागरी सुविधा पुरविणे , सांडपाणी व्यवस्थापन ,पाणी पुरवठा आणि रस्ते विकास ही सर्व कामे गुणवत्तापूर्ण व्हावीत म्हणून उन्हातान्हाची पर्वा न करता स्वतः उभे राहून म्हणून देखरेख करून पूर्ण करून घेतली.याबद्दल त्यांचा तत्कालीन पालकमंत्री श्री विजयकुमार देखमुख यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला., एका सामाजिक संस्थेकडून गेल्या नवरात्रात तुळजापूर कडे पायी जाणाऱ्या भाविकांना अन्न प्रसाद वाटप करण्यात येत होते. त्यावेळी अधिकारीपणाची झुल उतरवून एखाद्या सामान्य भाविक कार्यकर्त्याप्रमाणे त्यांनी अत्यंत आवडीने सेवा बजावली. विशेष म्हणजे तो त्यांच्या सुट्टीचा दिवस होता. विजय लोखंडे यांच्या कार्याबद्दल तत्कालीन महानगर पालिका आयुक्त दीपक तावरे यांचे कडून सत्कार २०१९ साली त्यांचा सत्कार करण्यात आला.तसेच इतर काही वेळा नागरिकांनी देखील त्यांचा उस्फुर्त सत्कार केला आहे.

विजय लोखंडे यांच्या सारखाच दृष्टिकोन आणि कार्यशैली सर्व महानगर पालिका,नगरपालिका,जिल्हा परिषदा यांच्यातील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी ठेवली तर आपली सर्वच शहरे स्वच्छ व सुंदर दिसतील. अन्यथा केवळ आदेशांचे पालन म्हणून तात्पुरती स्वच्छता मोहिम राबविल्यास, मोहीम संपली की शहरे आणि गावे पुन्हा बकाल दिसायला लागतात,हे आपण पाहतोच. विजय लोखंडे यांच्या पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा.

**लेखनः देवेंद्र भुजबळ**
**-९८६९४८४८००**

# स्वामी विवेकानंद जगाच्या पाठीवरील महान युगपुरुष

स्वामी विवेकानंद यांचा जन्म १२ जानेवारी १८६३ रोजी कोलकाता येथे झाला.स्वामी विवेकानंद यांची आवड आणि अभ्यास प्रगल्भ होता.त्यांना संगीत, साहित्य आणि तत्वज्ञान यात विशेष रस होता.याव्यतीरीक्त पोहणे, घोडेस्वारी व कुस्ती हे त्यांचे आवडते छंद होते. वयाच्या २५ व्या वर्षी स्वामीजींनी वेद,पुराण, बायबल, कुराण,धम्मपद,तनाख, गुरू ग्रंथ साहिब,दास कॅपिटल, भांडवलशाही, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र या सर्वच विचारधारा एकत्र केलेल्या होत्या. म्हणजे त्यांना इतर सर्व ज्ञान तर होतेच परंतु जगातील संपूर्ण धर्माचा अभ्यास त्यांनी अवगत केलेला होता.यावरून असे वाटते की स्वामी विवेकानंदांना संपूर्ण ब्रम्हांडाचे ज्ञान असल्याचे दिसून येते. याला दैवी शक्तीच म्हणावे लागेल.कालांतराने रामकृष्ण परमहंस यांच्या आश्रयाला गेले व रामकृष्ण परमहंस यांच्या रहस्यमय व्यक्तीतत्वाने ते अत्यंत प्रभावीत झाले आणि त्यांचे संपूर्ण जीवन बदलले.स्वामींनी १८८१ मध्ये रामकृष्ण परमहंस यांना आपले गुरू केले.१८८६ मध्ये रामकृष्ण परमहंस यांच्या मृत्यूनंतर स्वामी विवेकानंदांच्या कार्याला एक नवीन वळण आले. वयाच्या २५ व्या वर्षी त्यांनी भगवे वस्त्र धारण केले व संपूर्ण भारतभर पायी प्रवास सुरू केला.देशातील गरीबी आणि सामाजिक दुष्टांची अवस्था पाहून त्यांची मनस्थिती दु:खावली गेली.काही दिवसांतच शिकागो येथे जगातील धर्म परिषद होणार असल्याची माहिती मिळाली.११ सप्टेंबर १८९३ ला शिकागो येथे जगातील धर्म परिषद भरली.भारताचे प्रतिनिधी म्हणून स्वामी विवेकानंद तेथे पोहोचले.तिथे अनेकांनी खूप प्रयत्न केले की स्वामी विवेकानंद यांना बोलायला वेळ मिळुन नये. परंतु एका अमेरिकन प्राध्यापकाच्या प्रयत्नाने त्यांना बोलायला थोडा वेळ मिळाला.त्यानी जागतिक धर्म परिषदेतील धर्म संसदेतील भाषणाची सुरुवात बंधु व भगिनीअसे करून केली. यानंतर त्यांच्या भाषणाचे विचार ऐकून संपूर्ण धर्म परिषद स्तब्ध झाली व टाळ्यांचा कडकडाट झाला जनुकाय आकाशवाणी झाली की काय आणि स्वामी विवेकानंद जगप्रसिद्ध झाले व त्यांचे अमेरिकेत जोरदार स्वागत झाले. युगानुयुगे आपल्या तेजस्वी विचारांची ज्योत संपूर्ण जगात सकारात्मक व शांती प्रदान करणारी रहावी या उद्देशाने स्वामी विवेकानंद यांनी आपले कार्य पुढे सुरूच ठेवले. एकतेचा संदेश जगाला देऊन सर्व मानवजातीला बंधुतेचा, मानवतेचा संदेश देणारे व सुखशांती निर्माण करणारे कार्य स्वामी विवेकानंद यांनी केले.त्यांनी जगाचा इतिहास आणि पाश्चात तत्वज्ञानांचा अभ्यास महाविद्यालयीन जीवनातच केला. अनेक धर्माच्या तात्विक अभ्यासामुळे त्यांनी अमेरिकेतील शिकागो येथे भरलेल्या सर्वधर्म परिषदेत हिंदू धर्माचे प्रतिनिधित्व त्यांनी केले. ११ सप्टेंबर १८९३ या दिवशीच्या त्यांच्या भाषणाने संपूर्ण सभा प्रभावित झाली व १७ दिवसाच्या या परिषदेत हिंदुस्थानातील प्रभाव दिसून आला.मुलांचा सर्वांगीण विकास व त्यांच्या कौशल्यांचा विकास व्हावा, मुले आत्मनिर्भर व्हावी असे त्यांचे स्पष्ट मत होते. त्यांच्या या शैक्षणिक विचारांची प्रासंगिकता आजच्या युवा पिढींनी अवगत करायला हवी. मूलांचा शारीरिक, मानसिक आणि अध्यात्मिक विकास होऊन मन,बुद्धी विकसित करणारे, स्वावलंबी, चारित्र्यसंपन्न ओळख निर्माण करणारे शिक्षण असावे असे त्यांचे मत होते. भारताच्या आध्यात्मिक संस्कृतीबद्दल गाड अभिमान असला, तरी त्यात शिरलेल्या अनिष्ट रुढी, परंपरा, जातीभेद यांसारख्या हीन गोष्टींवर त्यांनी भाषणांतून कडाडून हल्ला चढवला. निराकार समाधीत मन रहाण्याची स्वत:ची स्वाभाविक प्रवृत्ती बाजूला सारून त्यांनी सर्वसामान्य लोकांच्या सुखदुःखाचा योग्य पातळीवरही विचार केला आणि त्यांच्यासाठी झटले व सर्वस्वाचे समर्पण म्हणजेच खरा संन्यास' हे वचन सार्थ केले. स्वामी विवेकानंद हे सर्व तरुणांचे आजही प्रेरणास्थान आहेत. अशा या महान तत्त्वज्ञानी महापुरुषाला माझा सलाम.आज देशात आपल्याला जी काही एकता आणि बंधुता दिसून येत आहे त्याचे संपूर्ण श्रेय स्वामी विवेकानंदांना जाते.१८९९ साली स्वामीजींनी पुन्हा पश्चिमेकडे प्रवेश केला आणि भारतीय संस्कृतीचा, अध्यात्माचा संदेश प्रसारित केला. अशाप्रकारे परदेशातही त्यांनी भारताची भूमिका मांडण्याचे काम त्यांनी केले.असा तेजस्वी महापुरुष भारत भुमिला लाभला हे भारतीयांचे अहोभाग्यच आहे.आजही आपला देश स्वामी विवेकानंदांच्या विचारधारेवर चालतो ही भारतीयांसाठी स्वाभिमानाची बाब आहे.अशा महापुरुषांनी पुन्हा-पुन्हा जन्म घ्यावा असे वाटते.परंतु आजही स्वामीजींची आस्था सर्वांच्या ह्रदयात घर करून आहे.मी संपूर्ण भारतवासीयांना विनंती करतो की स्वामी विवेकानंदांचे विचार अवश्य अवगत करावे. आपणा सर्वांचाच मार्ग सुखरूप व मोकळा होईल. जोपर्यंत सुर्य,चंद्र,तारे,आकाश-पाताळ,ग्रह-तारे आहेत तोपर्यंत स्वामीजींचे विचार सर्वांच्याच ह्रदयात राहिल.स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त सरकारने, सामाजिक संघटना, शाळा-महाविद्यायासह संपूर्ण युवावर्गानी आजच्या दिवशी वृक्षलागवड केली पाहिजे.यामुळे गुरांना चारा व संपूर्ण मानव जातीला आणि प्राणीमात्रांना शुद्ध हवा व ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल.यामुळे अनेकांचे प्राण आपल्याला वाचविता येईल व प्रत्येक झाडाच्या पानात, फुलात,फळात व जळामुळात आपल्याला स्वामींचे अवश्य दर्शन होईल.स्वामीच्या जयंती निमित्त कोटी कोटी प्रणाम.जय हिंद!



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर**

पान १ वरुन

### बजरंग दलाच्या ...

जर्सी गायी असल्याचे आढळून आल्या. त्यावरून ११२ नं. डायल करून चंदनझीरा पोलीसांना घटनास्थळी बोलावण्यात आले.पोलीसांनी आयशर वाहन आणि जनावरे ताब्यात घेऊन कारवाई केली आहे.

तीन लाख रू. किमतीचे आयशर वाहन चंदनझीरा पोलीसठाण्यात जमा करण्यात आले तर तीन लाख रु, कीमंतीच्या सोळा गाई मंठा रोडवरील गौशाळेमध्ये सोडण्यात आले असल्याची माहीती चंदन जिरा पोलीस ठाण्याचे कॉन्स्टेबल रिंकू देशमुख यांनी दिली.

यावेळी राहुल वर्तले, देवगिरी प्रांत गौरक्षा प्रमुख, विशाल वाघमारे, उमेश गवारे, अमोल भाभले, कार्तिक लिधौरिए , रोहित जाधव, अजिंक्य शिंदे, उमेश गवारे, अमोल बाभले, आदित्य काबळे, रोहित गायकवाड़, किरण झारखंडे, यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

### सुरक्षित प्रवासासाठी ...

करताना एस. टी. बसला प्राधान्य द्यावे असे चौरे शेवटी म्हणाले.

यावेळी बोलताना आगारप्रमुख माधुरी देशमुख म्हणाल्या की, एस. टी. हे प्रवासाचे सर्वात सुरक्षित साधन आहे.दुरवरच्या दुर्गम भागात देखील आता एस. टी. बस पोहोचली आहे.अशा प्रकारे एस. टी. चे जाळे राज्यात सर्वदूर पसरले आहे.अतिशय अल्पदरात प्रवाशांना सेवा दिली जाते.चालकांनी वाहतूक नियमांचे पालन करत अपघात होणार नाहीत याची काळजी घ्यावी असे आवाहन देशमुख यांनी केले.यावेळी त्यांनी उपस्थित चालकांना वाहतूक नियमांचे मार्गदर्शन केले.

याप्रसंगी प्राचार्य डॉ.दिरंगे,बालाजी ढोबळे,बाबासाहेब माकोडे, वंदना पोंगुळ यांनीही आपले विचार व्यक्त केले.

यावेळी उपविभागीय अधिकारी दादाहरी चौरे यांच्या हस्ते दहा, वीस, आणि पंचवीस वर्षे विना अपघात सेवा देणाऱ्या चालकांचा यथोचित सत्कार करण्यात आला. यामध्ये मो.आसेफ म. हबीब, रमेश राठोड, देवराव आढाव, चत्रभुज माकोडे, संजय सानप या चालकांचा समावेश आहे.

कार्यक्रमाला आगाराचे चालक, वाहक, मेकॅनिक विभागातील कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वरिष्ठ लिपिक मधुकर गोडबोले यांनी केले तर कैलास घोडके यांनी आभार मानले.

### सहा शाळांना ...

दत्तात्रय देशमुख, रामेश्वर अंबेकर, संतोष लिंगायत, जगदीश कुडे व सर्व पदाधिकाऱ्यांनी पार पडली.

यावेळी खालील शिक्षक व शाळांना पुरस्कार देण्यात आले. सारिका जालिंदर चंदनशिवे,जिल्हा परिषद प्रशाला,जागजी ता.जि. धाराशिव,सविता सदाशिव आढाव,जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,जांभुळपाडा ता. त्र्यंबकेश्वर जि. नाशिक, अरुणा नामदेव पवार,जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, अंचाडे ता. जि. धुळे , रोहिणी चंद्रकांत पिंपरखेडकर ,जिल्हा परिषद केंद्र प्राथमिक शाळा, कुंभेफळ, ता.जि. छत्रपती संभाजीनगर, वर्षादेवी बाजीराव कन्नाके ,जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, मेंढा (किरमिटी) ता. नागभिड जि. चंद्रपुर,सफिया अहेमद अब्दुल पटेल,जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, तुपेवाडी ता. बदनापूर जि. जालना, राजेश बाबाराव इघारे,जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा मंगरली, केंद्र - लेंडेझरी ता. तुमसर जि. भंडारा, राजेंद्र ज्ञानदेव कडव, जिल्हा परिषद केंद्र शाळा,गंगापुर ता. भुदरगड जि.कोल्हापूर, राजन गौतम गरुड,जिल्हा परिषद शाळा , बोरीचापाडा जि.पालघर, देवेंद्र कुमार जगन्नाथ बोरसे, जिल्हा परिषद शाळा, सिंदिपाडा - १ , ता. अक्कलकुवा जि. नंदुरबार, पद्माकर बाबुराव गोंडगे , जिल्हा परिषद प्रशाला, देऊळगाव गात ता. सेलू जि. परभणी, गोविंद नागोराव शिंदे , जेएसपीएम लातूर द्वारा संचलित,स्वामी विवेकानंद विद्यालय,कळंब रोड, लातूर जि. लातूर , संदीप तात्यासाहेब माने,मुलुंड विद्यामंदिर न्ड ज्युनिअर कॉलेज, मुलुंड जि. मुंबई,सुनील भाऊराव वानखडे, अनुसूचित जाती मुलींची शासकिय निवासी शाळा,शेळद ता. बाळापूर जि.अकोला,शरद नंदराम औरंगे, श्री. शारदा भवन एज्युकेशन सोसायटी, नांदेड संचलित - इंदिरा गांधी हायस्कूल, नांदेड जि. नांदेड, संजय पुंडलिक खंडार,श्री. सत्यसाई विद्यामंदिर,अंबिका नगर, नागपूर जि. नागपूर, मिलिंद नारायणराव पंडागळे, कै. नानासाहेब पाटील प्राथमिक विद्यालय, चंदनझिरा, जि. जालना, पवन प्रभाकरराव कुलकर्णी,

रामचंद्र किनगावकर प्रा. विद्यालय, योगेश्वरी नगर, जुना जालना जि. जालना स्वाती जितेंद्र देसाई, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, भुईंज जि. सातारा, शोभा केशव जाधव, लोकनेते राजारामबापू पाटील प्राथमिक विद्यामंदिर, कवठेमहांकाळ जि. सांगली, अनघा जितेंद्र सासवडकर, सावित्रीबाई फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय राहुरी, जि. अहिल्यानगर, वंदना रमेश ठाकरे ,सेंट्रल पब्लिक स्कूल, मेहकर जि. बुलढाणा, दिपाली एकनाथराव बारगजे, सहशिक्षिका - शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, यशवंत प्राथमिक विद्यालय, बीड जि. बीड व मंदाकिनी खलसे, संत ज्ञानेश्वर प्राथमिक विद्यालय, शाकुंतलनगर,जालना जि. जालना. तर नई तालीम व्दारा संचलित, आनंद निकेतन विद्यालय, सेवाग्राम जि. वर्धा, जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, थुगांव जि. नागपूर, शांती निकेतन विद्यामंदिर, संभाजीनगर, जालना जि. जालना , जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा , बारसवाडा ता.अबंड जि. जालना, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,श्रीरामतांडा ता. मंठा जि. जालना व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, हिवरा रोषणगांव ता. जि. जालना

# आगामी निवडणुका जिंकण्यासाठी भाजपा व युवा मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी संगठन मजबूत करावे - भास्कर दानवे

## जालना शहरातील संग्राम नगर येथे भाजयुमो चे शाखा उदघाटन



**जालना । प्रतिनिधी -** आगामी सर्वच निवडणुका जिंकण्यासाठी भाजपा व युवा मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी वार्डा-वार्डात भारतीय जनता पार्टीचे संगठन मजबूत करून केंद्र व राज्य सरकारच्या योजना माजी केंद्रीय मंत्री श्री.रावसाहेब पाटील दानवे यांच्या मार्गदर्शनाखाली तळागाळातील जनतेपर्यंत राबविण्याचे अवाहन जालना विधानसभा भास्कर दानवे यांनी जालना महानगरातील संग्राम नगर येथे भारतीय जनता पार्टी च्या शाखा उदघाटन (दि.०९) प्रसंगी केले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, जालना महानगराध्यक्ष सतीष जाधव, प्रदेश निमंत्रित सदस्य विजय कामड, विमलताई आगलावे, ओबीसी प्रदेश उपाध्यक्ष सोपान पेंढारकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

संग्राम नगर जालना येथील शाखा अध्यक्ष श्री.सतीश सूर्यवंशी, मार्गदर्शक आनंद भगत, बद्रीनाथ जांगडे, उपाध्यक्ष श्री.आनंद नाटेकर, सचिव श्री.उदय उपासे, सह सचिव श्री.दिपक नाटेकर, कोषाध्यक्ष प्रद्युम विजयसेनानी, सह कोषाध्यक्ष युवराज राजपूत तर सदस्य म्हणून सतीष सूर्यवंशी, आनंद नाटेकर,उदय उपासे,दिपक नाटेकर, प्रद्युम विजयसेनानी,युवराज राजपूत, रोहित जाधव, ललित गायकवाड, रोहित गायकवाड, चेतन नाटेकर,राहुल उपासे, प्रीतेश विजयसेनानी, विशाल काथवडे, अक्षय, राठोड,लोका भगत, यश कालीवाले, भरत कालीवाले,नितीन राजपूत, प्रदीप नाटेकर, निखील खाकीवाले, कार्तिक कोलापुरे, अक्षय राजपूत, कुंदन राजपूत, संतोष राजपूत, बजरंग राजपूत, कुणाल सरनाईक, कृष्णा धाडले, अमोल उपासे, करण माने, पवन राजपूत, करण राजपूत, उज्वल शेलार, राजन गायकवाड, रितिक शेलार, धनपाल जटावाले, गौरव खाकीवाले, अक्षय खांडेकर, रणवीर जटावाले, राम भूरेवाल, किरण माजण, मानव शेलार, राहुल पोतराज, विवेक भूरेवाल, शुभम भूरेवाल, अभिषेक भूरेवाल, नैतिक भूरेवाल, रवी नंद, अर्जुन फतेलष्करी, सचिन मेघावले, रोहित लांडगे यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना भास्कर आबा दानवे म्हणाले की, युवकांना भारतीय जनता पार्टी सोबत घेऊन राष्ट्रकल्याणाच्या कार्यात युवाशक्तीचा उपयोग करून घेण्याच्या उद्देशाने भाजपा व भाजयुमो च्या शाखा स्थापन करण्यात येत आहे. असंख्य युवकांना भाजपासोबत जोडून पक्ष संघटन अधिक मजबूत करण्यासाठी जालना भाजपाच्या वतीने शाखा स्थापना कार्यक्रम आखण्यात आला असून, पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी व माजी केंद्रीय मंत्री श्री.रावसाहेब पाटील दानवे यांच्या नेतृत्वाखालील भाजपा सरकारने सर्वसामान्यांसाठी कल्याणकारी असे निर्णय घेतले आहेत. यामुळे संपूर्ण देशातील नागरिक मोदी सरकारच्या कामगिरीवर खुश असून, आता युवक, शेतकरी, कष्टकरी, छोटे-मोठे व्यावसायिक तसेच सर्वसामान्य नागरिक भारतीय जनता पक्षाच्या पाठीमागे खंबीरपणे उभे आहेत. त्याचबरोबर महाराष्ट्र राज्यात भाजप पक्षाच्या सदस्यता नोंदणी महाअभियानाला सुरु आहे. यानिमित्त जालना विधानसभेत प्रत्येक बूथ वर सदस्य नोंदणी अभियानास सुरुवात करण्यात आली. जालना शहरात पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणावर सदस्य नोंदणी करावी. राष्ट्राला समर्पित भावनेने काम करणाऱ्या भाजपा च्या या महासदस्य नोंदणी अभियानात अधिकाधिक नागरिकांनी सहभागी व्हावे व या अनुषंगाने अभियानाला अधिक गतिमान करून सक्रीय सहभागासाठी विशेष प्रयत्न करावे असे आवाहन शाखा उदघाटन प्रसंगी भास्कर दानवे यांनी केले.

यावेळी सिद्धिविनायक मुळे, अमोल कारंजेकर, सुभाष सले, आनंद झारकंडे, रामलाल जाधव, सुनील पवार, रोषण चौधरी, सेवक नारीयलवाले, डोंगरसिंग साबळे, करण झाडीवाले, प्रभुलाल गोमतीवाले, महेंद्र अकोले, पदाधिकारी व कार्यकर्त्यांची प्रमुख उपस्थिती होती.

# कॉंग्रेसचे युवा नेते नितीनकुमार जेथलिया कार्यकर्त्यांसह शिवसेनेत!

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत मुंबईत रंगला प्रवेश सोहळा



**परतुर । प्रतिनिधी -** परतुर मंठा मतदारसंघाचे काँग्रेसचे युवा नेते नितीनकुमार जेथलिया यांनी दिनांक ९ जानेवारी रोजी मुंबई येथे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या हस्ते शेकडो कार्यकर्त्यो सह शिवसेना शिंदेग गटात प्रवेश घेतला. आनंद आश्रम, टेंभी नाका,ठाणे येथे रंगलेल्या या प्रवेश सोहळयात मा.मंत्री खा.संदिपान भुंबरेसह नेत्यांची उपस्तीथी होती.

या प्रवेशाबद्धल नितीनकुमार जेथलिया म्हणाले की, गेल्या अनेंक वर्षापासुन मा.आ.सुरेशकुमार जेथलिया यांच्यासोबत काँग्रेसचे इमानदारीने काम करत कार्यकर्त्योची मोठी फळी निर्माण केली. व काँग्रेस पक्षाला चांगले दिवस आणले मात्र शब्द देउन ऐन वेळेला वरीष्टांनी महाविकासघाडीत मित्रपक्षाला जागा सोडत सुरेशकुमार जेथलिया यांना उमेदवारी पासुन डावलले.तरी देखील केवळ कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव जेथलिया साहेंबानी विधानसभेत अपक्ष लढत देऊन ताकद दाखवली.मराठवाडयाचे नेते अर्जुनरावजी खोतकर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व कार्यकर्त्यांनी राज्याचे कर्तबगार नेतृत्व मा.उपमुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे यांच्या हस्ते शिवसेनेत प्रवेश घेतला असल्याचे ते म्हणाले .याबाबत बोलतांना पुढे म्हणाले की मा.आ.सुरेशकुमार जेथलिया हे देखील लवकरच निर्णय घेणार असून मतदारसंघात मोठया समारंभासह व सर्व कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन शिवसेना शिंदे गटात प्रवेश घेणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. खरे तर आम्ही स्वगृही परतलो असल्याचे समाधान वाटत असल्याचे म्हणत एकनाथराजी शिंदे हे कार्यकर्त्यांची जाण असणरे नेते व कामाची दखल घेणारे नेतृत्व असून निर्णय घेण्याची क्षमता व कार्य करण्याची धमक असणारे नेते असल्याच्या भावना त्यांनी व्यक्त केल्या. अशा नेत्याच्या नेतृत्वाखाली काम काण्यास आम्हा कार्यकर्त्योना निश्चित समाधान वाटणार असल्याचे ते म्हणाले.सर्व वरिष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली पुन्हा परतुर मंठा मतदारसंघात शिवसेनेचा झंझावत निर्माण करणार असल्याची त्यांनी ग्वाही दिली.

दरम्यान नितीनकुमार जेथलिया यांच्या मार्गदर्शनाखाली जि.प.सदस्य इद्रजित घनवट,आशिषजी जेथलिया,मंठा काँग्रेस कार्याध्यक्ष योगेश अवचार,काँग्रेसचे उपतालुका प्रमुख मंजुळदास सोळंके,कार्याध्यक्ष सिद्धेश्वर अंभुरे,युवक काँग्रेस उपाध्यक्ष सचिन बोंबले मा.पं.स.सभापती संतोष पवार,पांगरी गोसावी सरपंच मानकर,मा.नगराधक्ष अविनाश शहाणे, दिलीपरावजी चव्हाण,तारेखजी सिद्धीकी ,विकास खुळे,अमेर खा पठाण या पदाधिकाऱ्यांसह शेकडो काँग्रेस कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश घेतला आहे.

# जेईएस महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय संशोधन परिषद



**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्हयात भारतीय ज्ञान परंपरेचा यथोचित वापर करून जालना जिल्हा हा आत्मनिर्भर भारत, जैवविविधता ,ग्रामस्वराज्य तसेच पर्यावरण पूरक योजनांसाठी देशात रोल मॉडेल झाला पाहिजे असे प्रतिपादन जेईएस महाविद्यालयाच्या भौतिकशास्त्र विभागातर्फे आयोजित संशोधन परिषद उद्घाटन प्रसंगी भारत सरकारचे निवृत्त सचिव डॉ.कमल टावरी यांनी केले.

जेईएस महाविद्यालय जालनाच्या भौतिकशास्त्र विभागातर्फे आंतरराष्ट्रीय संशोधन परिषदेचे आयोजन दि.१०व ११जानेवारी २०२५ रोजी महाविद्यालयाच्या सभागृहात करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्ष जालना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष पुरुषोत्तम बगडिया हे होते प्रमुख उद्घाटक म्हणून भारत सरकारचे निवृत्त सचिव डॉ.कमल टावरी होते प्रमुख अतिथी म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगरचे निवृत्त भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. जी के बीचिले होते तसेच विद्यापीठ व्यवस्थापन सदस्य डॉ.गजानन सानप व डॉ. अंकुश कदम सोसायटीचे सचिव श्री श्रीनिवास भक्कड होते. व्यासपीठावर जेईएस एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष श्री फुलचंद भक्कड तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री संशोधन परिषदेचे संयोजक प्रा. डॉ. सुशांत देशमुख आदींची उपस्थिती होती.

भौतिकशास्त्र संशोधन परिषद आयोजना मागील भूमिका, नवीन संशोधक तयार करणे असून, त्यासाठी महाविद्यालय प्रयत्नशील असल्याचेही प्रयत्नशील असल्याचेही प्रा. डॉ. सुशांत देशमुख यांनी सांगितले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व उपस्थितांचे स्वागत प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांनी केले, भारतीय ज्ञानपरंपरेचा येथोचित वापर करून जालना जिल्ह्यात जी एस महाविद्यालय प्राध्यापक शिक्षक वर्गाने समाजामध्ये नेतृत्व निर्माण करून जागृती निर्माण करावी, प्राचीन भारतीय ज्ञानपरंपरा लहान -लहान प्रसंगांमध्ये समाज मनामध्ये खोलवर दिलेली आहे ते शोधण्याचे मोठे कार्य महाविद्यालयाच्या भौतिकशास्त्र विभागाने करावे प्राचीन भौतिकशास्त्र , खगोलशास्त्र ,गणित व संगीत शास्त्र, तसेच धातुशास्त्र आदी संकल्पने संशोधन होणे गरजेचे आहे. आवश्यक आहे, यासाठी जे एस महाविद्यालय प्रयत्नशील असल्याचेही असेही प्राचार्य डॉ.गणेश अग्निहोत्री यांनी सांगितले.

यावेळी भौतिकशास्त्र संशोधन परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख उद्घाटक म्हणून बोलताना डॉ. कमल टावरी म्हणाले की जालना जिल्हा हा आत्मनिर्भर भारत जैवविविधता ग्रामस्वराज्य तसेच पर्यावरण पूरक योजनासाठी देशात रोल मॉडेल झाला पाहिजे, कमवा व शिका ही योजना विद्यार्थ्यांच्या घराघरात पोहोचली पाहिजे, देशातील युवक स्वयंरोजगार निर्माता झाला पाहिजे .त्यामुळे भारत आत्मनिर्भर होईल असेही डॉ.टावरी यांनी सांगितले.

यावेळी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ.गजानन सानप व डॉ.अंकुश कदम यांनीही या परिषदेत आपले मनोगत व्यक्त केलेत. अध्यक्षीय समारोप करताना पुरुषोत्तम बगडिया यांनी केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ.अरुणा महारोळकर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. सुनील इंदुरकर यांनी व्यक्त केलेत, यावेळी १५० संशोधक विद्यार्थी तसेच महाविद्यालयातील शिक्षक- शिक्षकेतर कर्मचारी हजर होते जालना शहरातील नामवंत उद्योजक प्रतिष्ठित नागरिकही उपस्थित होते.

# परतूर आयटीआयमध्ये वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

**परतूर । प्रतिनिधी -** राजमाता जिजाऊ व युगपुरुष स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्त परतूर येथील शासकीय औद्यागिक प्रशिक्षण संस्थेत वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

उद्योजकता प्रेरणा कार्यक्रमाअंतर्गत इयत्ता ९ वी, १० आणि आयटीआयच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित या स्पर्धा रविवारी सकाळी ११ वाजता परतूर येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत आयोजित करण्यात आली आहे.

कृत्रिम प्रज्ञा (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) शाप की वरदान, आत्मनिर्भर भारत, स्वामी विवेकानंद यांचे उद्योजकता, कौशल्ययांबद्दलचे विचार, देशाच्या विकासात कौशल्य शिक्षणाचे महत्त्व या विषयावर विद्यार्थ्यांना आपले मत मांडत येणार आहे. परतूर तालुक्यातील सर्व मान्यता प्राप्त शाळांमधील इयत्ता ९ आणि १० वीचे विद्यार्थी तसेच आयटीआय मधील प्रशिक्षणार्थी या स्पर्धेत सहभागी होऊ शकतात. प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या स्पर्धकांना अनुक्रमे ५ हजार, ३ हजार आणि २ हजार असे रोख पारितोषिक आणि प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. स्पर्धेत सहभागी शाळा आणि स्पर्धांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. तालुक्यातील जास्तीत जास्त शाळांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवावा असे आवाहन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य राजेश धानोरकर यांनी केले आहे.



**जुना जालना भागातील मुक्तेश्वरवेशजवळील फॅन्ट्सी किड्स स्कूलमध्ये हस्तकला प्रदर्शन संपन्न झाले. यावेळी उपस्थितांनी चिमुकल्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले. यावेळी मुलांसोबत पालकांनी विविध विषयांवर हस्तकलेच्या माध्यमांतून सुंदर कलाकृती सदर केल्या. यावेळी शाळेतील संचालिका छाया नाईक, शिक्षिका योगिता शिराळकर, अल्पना पूरी, ज्योती अग्निहोत्री, प्रियंका बिडवे, रेखा राऊत यांनी परिश्रम घेतले.**

# पहिल्या ट्रॉफीचे मानकरी प्रल्हाद लोणकर

## तुमच्या सोबत एक पत्रकार म्हणजे सहा मित्र सोबत - प्रा राजेंद्र मगर



**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** आद्य पत्रकार, दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंती निमित्त आयोजित दर्पण दिनाच्या कार्यक्रमाला मोठा प्रतिसाद भेटला.या वेळी तहसीलदार मॅडम डॉ.सारिका भगत,पो निरीक्षक प्रताप इंगळे, मराठी पत्रकार संघाचे जिल्हा सदस्य मोहन मुळे, मुख्य आकर्षण व्यक्ते प्रा. रवींद्र मगर यांच्या सह पी जी तांबेकर गटविकास अधिकारी खिल्लारे निवनिर्वाचितअध्यक्ष मुकेश भारद्वाज,प्रदीप बोबडे,मंडळ अधिकारी इंगोले,भुते साहेब,यांचा सह अनेक मान्यवर मंचावर उपस्थित होते.

या वेळी कार्यक्रमाचे प्रस्ताविक जेष्ठ मार्गदर्शक मोहन मुळे यांनी करत आपल्या पहिल्या बक्षीस आणि पत्रकार संघा विषियी आपले मत मांडले.येथील पो निरीक्षक प्रताप इंगळे यांनी आपल्या भाषण मध्ये आपले पुढील प्रमाणे मत मांडले. आपला उद्देश एक असून पोलिस आणि पत्रकार या नाण्याच्या दोन बाजू असल्याचे सांगत माझा येथील पत्रकार संघा बाबत अनुभव खूप चांगला असून नक्की येथून गेल्यावर तुम्हाला मिस करू अश्या शब्दात यांचा मान वाढविला.या वेळी सारिका भगत यांनी येथील पत्रकार यांची मोठी तारीफ करत नेहमी मदतीचे आश्वासन देत येथील संघ खूप चांगला असून आम्हाला मदत असून त्यांना ही मदत करू असे सांगितले .या पहिल्या वर्षी भेटलेल्या समर्थ दर्शन पत्रकार पुरस्कार भेटलेल्या प्रल्हाद लोणकर यांनी भेटला असून भेटलेल्या पुरस्कार बदल धन्यवाद मनात माझ्या योग्य सन्मान बद्दल आभार व्यक्त केले आणि आपला भाव व्यक्त केला. या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण असलेले प्रा रवींद्र मगर यांनी आपले मनमोहक व्यक्त करता वेळी सर्व प्रथम अश्या कार्यक्रमाला बोलवून माझा सन्मान केला असे सांगत आपले पुढे मनोगत ठेवले. दर्पण दिन असून पत्रकार हा आपल्या जीवनात मित्र असला पाहिजे गरजेचे असते कारण त्यांच्या कडे सगळ्या प्रश्नांचे उतर असते. कारण एक पत्रकार म्हणजे तुमच्या कडे सहा मित्र आहे असे मी समजतो. पत्रकार यांनी देण्याचे काम आता पर्यंत देत आल्याचे काम करत आले आहे.पत्रकार यांनी समाजाला दिशा देण्याचे काम करत आले आहे.आज पहिल्या वर्षी सुरू केल्याला पुरस्कार बद्दल मोहन भाऊ हे खरे जीवन गौरव पुरस्कार चे खरे मानकरी असल्याचे सांगत मोहन भाऊ यांच्या पत्रकार क्षेत्रातील काम उलखेनिया असल्याचे सांगितले. पत्रकार हा व्यवसाय नसून एक आपल्या आपली मधील एक समाजातील उणीव कमी करण्याचे काम करणारी व्यक्ती आहे असे मत मांडत आयोजित कार्यक्रमाचे आपल्या शैलीत सन्मान केला.समाजाला पुढे आणण्याचे काम आता लोक पत्रकार करत आले हे तितकेच सत्य असल्याचे सांगितलं.पत्रकार अशी शक्ती आणि व्यक्ती आहे की ते कुठे ही चालतात. संघर्षमय जीवन जगण्याचे त्यांचे काम असून त्यांचे प्रेरणा घेण्यासारखी काम असून मला त्यांचा खूप अभिमान आहे असे सांगितले. अनेक विषय त्यांनी मांडत माझे जाफ्राबाद गावंच्या पाणी प्रश्न कडे विशेष करून बातमी मार्फत लक्ष्य देण्याची विनंती त्यांनी केली. सोलजर, लेबर, फारमर, हे तीन आपल्या देशाचे सन्मान असून यांच्या ही बातम्या समस्या प्रकाशित करावी असे ही त्यांनी नमूद केले. या वेळी मगर यांनी कविता मांडली. सापाच्या जंगलात माणूस या कवितेतून माणसाचं आणि सापाचे कसे असते ते आपल्या वेगळ्या शैलीत मांडून सर्वांची वाह व्वा मिळविली. या कार्यक्रमाचे सूत्र संचलन पत्रकार ज्ञानेश्वर पाबळे विशाल वाकडे,केले तर आपल्या पुरस्कार ला उतर देता वेळी प्रल्हाद लोणकर यांनी करून दिलेल्या माना बद्दल ऋण व्यक्त केले. या वेळी मोहन मुळे, अलकेश सोमाणी,पो निरीक्षक प्रताप इंगळे, डॉ.सारिका भगत यांनी समयोचीत भाषण केले. कार्यक्रमानंतर अल्पोहर नंतर कार्यक्रम पार पडला.पहिल्या पुरस्कार नंतर दर वर्षी हा कार्यक्रम चालू राहील असे सांगत आज सर्वांच्या सहकार्य मुळे मला हे पुरस्कार देण्याचा बळ भेटले आनंद भेटला असे मनोगत या वेळी जेष्ठ पत्रकार मोहन मुळे यांनी मांडले.

# अ.भा. महात्मा फुले समता परिषदेच्या जिल्हा उपाध्यक्षपदी बाबासाहेब वानखेडे



**जालना । प्रतिनिधी -** अ.भा. महात्मा फुले समता परिषदेच्या जिल्हा उपाध्यक्षपदी बाबासाहेब शिवाजीराव वानखेडे यांची निवड संस्थापक अध्यक्ष आ. छगनराव भुजबळ यांच्या आदेशाने प्रदेश उपाध्यक्ष सुभाष राऊत व जिल्हाध्यक्ष मधुकर झरेकर यांनी केली. बाबासाहेब वानखेडे यांच्या नियुक्तीबद्दल त्यांचे दिपक वैद्य, डॉ. विशाल धानुरे, आकाश वैद्य, कदम, संतोष गायकवाड,नितीन धायडे, संतोष गायकवाड, नितीन तायडे, निलेश वानखेडे, संदीप जैवळ, सचिन जैवळ, वैजीनाथ नागरे, सुरेश रत्नपारखे यांच्यासह समता सैनिकांनी अभिनंदन केले आहे.

युवा आदर्श | जालना | रविवार, दि १२ जानेवारी २०२५ | E-mail- yuva.aadarsh@gmail.com


# जाफराबाद ते जालना मार्गे माहोरा-बरंजळा साबळे, नळणी बससेवा सुरु करा

## अन्यथा शिवसेना स्टाईल आंदोलन; उपतालुकाप्रमुख अर्जुन ठोंबरे यांचा इशारा

**जाफ्राबाद । प्रतिनिधी -** जाफराबाद ते जालना मार्गे माहोरा- बरंजळा साबळे -नळणी बरड- नळणी चौफुली समर्थनगर नळणी - जवखेडा ठोंबरे- केदारखेडा- राजुर- जालना) बस सेवा तात्काळ सुरू करण्यात याव्यात अन्यथा शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शिवसेना भोकरदन उपतालुकाप्रमुख अर्जुन ठोंबरे यांनी विभागीय नियंत्रकांना दिलेल्या निवेदनात दिला आहे.

एसटी महामंडळाच्या विभागीय नियंत्रक जालना यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सर्वसाम ान्य नागरिकांना परवडणारी सुरक्षित असणारी व सर्वांच्या जिव्हाळ्याची दळणवळण व्यवस्था म्हणून महाराष्ट्र शासनाची राज्य परिवहन महामंडळ बस सेवा ओळखली जाते. समाजातील तळागाळातील शेवटच्या घटकांसाठी महाराष्ट्राची शान म्हणून ही लाल परी ओळखली जाते. जाफराबाद ते जालना (मार्गे माहोरा बरंजळा साबळे नळणी वरड नळणी चौफुली समर्थनगर नळणी- जवखेडा ठोंबरे -केदारखेडा- राजुर-जालना) ३५ वर्षांपूर्वी संपूर्ण रस्ते पक्के नसतांनाही ह्या मार्गावर दोन वेळेस बस फेर्या सुरू होत्या.

आता रस्ते गुळगुळीत असून



सुद्धा एसटी बस सेवा बंद असल्याने ३५ वर्षांपासून प्रवाशांची गैरसोय होत आहे; संबंधित मार्गावर येणाऱ्या गावांची वाढती लोकसंख्या व व्यापारी दृष्टिकोनाचे महत्त्व लक्षात घेता तसेच न्यायालय, जिल्हाधिकारी कार्यालय पोलीस अधीक्षक कार्यालय, धम ादाय कार्यालय, जिल्हा उद्योग केंद्र, समाज कल्याण कार्यालय, जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालय असे अनेक महत्त्वाचे मुख्य शासकीय कार्यालय जिल्ह्याचे ठिकाण असणार्या जालना शहरात असल्याने शासकीय काम किंवा वैयक्तिक कामानिमित्ताने वाढणारी प्रवाशी संख्या तसेच उच्च शिक्षणाचे केंद्र असणार्या जालना शहरात शिक्षण घेण्यासाठी वरील मार्गावरील जाणाऱ्या विद्यार्थ्यांची होणारी अडचण तसेच जिल्ह्यातील सर्वांत मोठी जालना शहरात असल्याने रोजगाराची संधी येथे उपलब्ध असतांना वरील मार्गावरील ग्रामीण भागातील युवकांना बस सेवा उपलब्ध नसल्याने रोजगार उपलब्ध असून सुद्धा त्याचा फायदा घेता येत नाही. अशा सर्व बाबीचा विचार केला तर दररोज साधारणता १०० ते १२५ प्रवाशी, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, जाफराबाद ते जालना (मार्गे माहोरा- बरंजळा साबळे - नळणी बरड- नळणी चौफ ुली- समर्थनगर नळणी- जवखेडा ठोंबरे - केदारखेडा- राजुर- जालना) ह्या मार्गावर जाणे-येणे करिता बस सेवा उपलब्ध नसल्याने ३५ वर्षांपासून प्रवाशांची गैरसोय होत असून त्यांना मोठ्या प्रमाणात अडचणींचा सामना करावा लागत आहे. अशा वरील सर्व बाबीचे महत्त्व आणि प्रवाशांना येणार्या अडचणी लक्षात घेऊन त्यांची गैरसोय टाळण्यासाठी जाफराबाद ते जालना शहराला जोडणारी जाफराबाद आगाराची बस सेवा सुरू होणे अत्यंत गरजेचे आहे. यांची गांभीर्याने घेऊन आमची मागणी मान्य करत तात्काळ जाफराबाद ते जालना बस सेवा सुरू करावी. अन्यथा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) स्टाईलने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही उपतालुकाप्रमुख अर्जुन ठोंबरे यांनी दिला आहे.

# शेत-केटीचे कोट्यावधींची कामे बोगस

## महसूलमंत्री विखे पाटील यांनी लक्ष देण्याची मागणी

**मंठा । प्रतिनिधी -** तळणी शिवारातील सरस्वती वढा येथे शेत केटीचे काम सुरू असून त्यात कोट्यवधी रूपयांचे कामे बोगस पध्दतीने करण्यात येत आहे. सदरील कामाकडे म हसुलमंत्री विखे पाटील यांनी लक्ष द्यावे अशी मागणी ग्राहक रक्षक समितीचे जिल्हाध्यक्ष कैलास पवार यांनी केली आहे.

या संदर्भात जिल्हाधिकारी जालना यांना निवेदन जिल्हा असून या निवेदनात म्हटले आहे की, तळणी शिवारातील शेतकेटीचे काम शासकीय नियमाप्रमाणे काम करावे लागते त्या नियमात कामे न करता बोगस पध्दतीने सुरू आहे. तसेच कामासाठी वापरले जाणारे मटेरियल हे अत्यंत निकृष्ट असून सध्या दगड, गिट्टी भरणे सुरू आहे. त्या ठिकाणी सळाईचा वापर करण्यात येत नसल्याचे देखील निदर्शनास आले आहे. ट्रॅक्टरने हायड्रोलिक करून मशिनच्या सहाय्याने माल टाकला जात आहे. जर त्याचा पाया पक्का नसला तर केटी टिकणार कशी? शासनाने जो लाभ दिलेला आहे. त्याचा योग्य प्रकारे उपयोग झाला पाहिजे. तळणी गावापासुन २ किलोमि टर अंतरावर हे काम सुरू



आहे. ते विदर्भ बॉन्ड्रीवर असल्याने त्याची कोणताही अधिकारीवर्ग येवून चौकशी करत नाही. इंजिनियर यांनी ऑर्डर देवुन काम चालु केले. काम जसे पाहिजे तसे होत नाही. तर शेतक-याचा काय फायदा होणार ? यामध्ये शासनाची दिशाभुल करून फक्त पैसे कमावण्याचा हेतु आहे. जे शासनाने दिड कोटी दिलेत शेतक- यांचा काहीतरी सिंचनाचा व विहिरीना पाणी राहील जेणे करून खडकाळ जमीन असल्याने भविष्यात फायदा होवु शकतो केटी जर मजबुत झाली तर जवळपास १५० ते २०० एकर शेतक- यांचा फायदा होवु शकतो. यामध्ये रेती वापरत नाही. कच पण व्यवस्थीत नाही. निव्वळ राख टाकण्यात येत आहे, जे माती पण मिक्स करत आहे. त्यावरच माल टाकणे चालु आहे. जो पाया खाली खडकाला लागे पर्यंत काम करायला पहिजे अशी ऑर्डर असते. परंतु त्यांनी खडकाला न लावता काळी मध्येच ट्रॅक्टरने दगडे टाकुन पाया बनवत आहे. तरी सदरील कामाची चौकशी करावी अशी मागणी कैलास पवार यांनी केली आहे.

# ७ स्टार ड्रीम फॅशन गारमेंट इंडस्ट्रीचे उद्घाटन



**परभणी । प्रतिनिधी -** ७ स्टार ड्रीम फॅशन गारमेंट इंडस्ट्रीज च्या निमित्ताने परभणी शहर आणि परिसरात अत्याधुनिक फॅशनेबल ड्रेसेस चे एक सुंदर दालन एकता सेवाभावी संस्था महाराष्ट्र संस्थापक अध्यक्ष अजमत खान आणि त्यांच्या धर्मपत्नी मुमताज खान यांच्या अथक परिश्रमातून साकारत आहे.परभणीकरांनी त्यांच्या या कार्याला साथ देत शिका आणि कमवा अंतर्गत आपल्या परिवाराला ही आधार द्यावा. परभणी करांची गरज लक्षात घेत परभणीकरांच्या सेवेत ही इंडस्ट्री साकारत असल्याचे समाधान व्यक्त करत स्वयंरोजगारातून समृध्दी आत्म सात करावी असे आवाहन उदघाटक इंजि. विष्णू सोनूने यांनी केले.

परभणी करांच्या सेवेत ७ स्टार ड्रीम फॅशन गारमेंट इंडस्ट्रीजच्या माध्यमातून रेडिमेड शालेय गणवेश, जेन्टस,लेडीज साठीचे फॅशनेबल ड्रेसेस पुरविले जाणार आहेत अशा उद्योगाला परभणी करांनी साथ देत अजमत आणि मुमताज खान यांच्या उद्योगाला उभारी द्यावी असे आवाहन अध्यक्षीय समारोपात प्रतापभैय्या देशमुख यांनी केले.

उदघाटन आणि स्वयंरोजगार मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी परभणी मनपाचे माजी महापौर मा. प्रताप देशमुख ( शहराध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट ) उदघाटक इंजि.विष्णू सोनूने माजी उपाध्यक्ष,अदानी थर्मल पावर स्टेशन,डहाणू तथा संस्थापक अध्यक्ष वॉस्पॉल इंस्प्रास्ट्रक्चर प्रा.लिमिटेड, जालना, विशेष अतिथी संचालक सौ. अंजली सोनूने, जालना. प्रमुख अतिथी ड.बारी सिद्दीकी, गफार मास्टर ज्येष्ठ नेते अल्पसंख्याक, नगर सेवक विजय धरणे, संजय कदम, शेख याकिन, शेख इक्बाल, शमशू हाश्मी, मोईन खान, रामभाऊ भवर, सय्यद मिनाज आदींची उपस्थिती होती.

आजम कॉलनी, कामगार कल्याण ऑफिस जवळ दर्गा रोड परभणी येथे आयोजित स्वयंरोजगार मेळाव्या साठी परभणी शहरातील बहुसंख्य पुरुष,महिला उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अरुण पडघन यांनी केले.

# नांगरतास मार्गे बोरगांव बससेवा तात्काळ सुरू करा- दिपक डोके

**जालना । प्रतिनिधी -** तालुक्यातील सेवली ते बोरगांव-नांगरतास - गोसावी पांगरी-कटाळा-यदलापुर वाटूर मार्गे जालना व परतुर ही दुहेरी बससेवा तात्काळ सुरू करावी अन्यथा वंचित बहुजन आघाडीच्या वतीने आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा उपाध्यक्ष दिपक डोके यांनी विभागीय नियंत्रकांना दिलेल्या निवेदनात दिला आहे.एस.टी महामंडळाच्या विभागीय नियंत्रक जालना यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की सेवली ते गोसावी पांगरी- वाटूर मार्गे परतुर बससेवा सुरू आहे परंतु गोसावी पांगरी पासून नांगरतास व बोरगांव हे फार कमी अंतर आहे. नांगरतास हे पर्यटन स्थळ रामगीरी बाबा यांच्या नावाने पंचक्रोशीत प्रसिद्ध आहे. नांगरतास येथे वर्षभरात लाखोंच्या संख्येने भाविक येत असतात तसेच बोरगांव येथील वाढती लोकसंख्या लक्षात घेता बोरगांव हे जालना जिल्ह्यातील सर्वात शेवटच्या टोकाचं गांव आहे.गावकऱ्यांना शासकीय, शैक्षणिक, वैद्यकीय व खाजगी कामासाठी जालना व परतुर जाण्या - येण्या करीता बससेवा उपलब्ध नसल्याने गैरसोय होत आहे .त्यांना मोठ्या प्रमाणात अडचणीचा सामना करावा लागत आहे करीता तात्काळ बससेवा सुरू करावी अन्यथा वंचित बहुजन आघाडीच्या वतीने आंदोलन छेडण्यात येईल असा इशाराही वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा उपाध्यक्ष दिपक डोके यांनी दिला आहे.



**कोरोना योद्धा माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे यांच्या वाढदिवसानिमित्त सामान्य महिला व बाल रुग्णालय गांधीचमन येथे गरजवंत महिलांना राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टी जालना शहर च्या वतीने फळ वाटप करण्यात आले याप्रसंगी ज्येष्ठ नेते इकबाल पाशा (NCPSP) जिल्हाध्यक्ष डॉ. निसार देशमुख, शहराध्यक्ष नंदकिशोर जांगडे, युवक शहराध्यक्ष राजेंद्र जाधव, संजय दाड, सय्यद रहीम, जयंत भोसले, कैलास मगरे, सतीश उबाळे, ज्ञानेश्वर धानुरे, अनवर तांबोली, तय्यब देशमुख, जमीर बिल्डर, गोकुल स्वामी आदींची उपस्थिती होती.**

# केंद्र शासनाचे नोटरी म्हणून ॲड. महेश धन्नावत यांची नियुक्ती



**जालना । प्रतिनिधी -** येथील प्रसिद्ध वकिल ॲड. महेश सिताराम धन्नावत यांची केंद्रीय शासनामार्फत नोटरीपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

या नियुक्तीबद्दल माजी केंद्रीय केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे, उद्योजक घनशाम दास गोयल, अर्जुन गेही, सुरेश अग्रवाल, समीर अग्रवाल, जतीन अग्रवाल, ड. शुभम भारुका यांनी शुभेच्छा दिल्या.

रावसाहेब दानवे यांनी सांगीतले की, जनतेचे कल्याण आणि सेवेसाठीच नोटरी सुविधा असते. लोकांना शपथपत्र व इतर कार्य करण्यासाठी त्यांच्या घरापासून प्रशासकीय कार्यालयात जाण्यासाठी वेळ व पैशाची बचत व्हावी यासाठीच शासनाने जनतेच्या हितात नोटरीची नियुक्ती केलेली आहे.

या नियुक्तीबद्दल ॲड. महेश धन्नावत यांनी केंद्रीय कायदा मंत्री अर्जुनराम मेघवाल, डॉ. सुरेश साबु, रो. अमित अग्रवाल (बिकानेर), ॲड. सिताराम धन्नावत यांचे आभार मानून जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष विकास पिसुरे, नोटरी असोसिएशनचे अध्यक्ष ड. सतीश तवरावाला यांच्या मार्गदर्शनाखाली निश्चितच जनतेच्या सेवेसाठी कटीबद्ध राहण्याची ग्वाही त्यांनी दिली. या नियुक्तीमुळे सर्वस्तरातून ॲड. धन्नावत यांचे अभिनंदन होत आहे.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.